# स्व. मा. कार्यसम्राट आ. विनायक (आबा) निम्हण

## यांच्या जयंतीनिमित्त सोमेश्वर फाऊंडेशन आयोजित



**विनायकी**
**विनायक निम्हण**
**गौरव शिष्यवृत्ती**
**वर्ष: चौथे**

मा. महोदय/महोदया,

**सस्नेह नमस्कार!**

आपल्या संस्थेचा पुणे शहरात मोठा नावलौकिक असून पुणे शहराची 'विद्येचे माहेरघर' आणि 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' अशी ओळख निर्माण करण्यात भरीव योगदान आहे. यामुळे आपणासोबत संवाद साधण्याची संधी मिळाल्याचा अभिमान आणि आनंद वाटतो.

येत्या 5 ऑगस्ट रोजी शिवाजीनगर मतदारसंघाचे स्व. माजी कार्यसम्राट आमदार विनायक (आबा) निम्हण यांची जयंती आहे. यानिमित्ताने पालकांची आर्थिक परिस्थिती बेताची असणाऱ्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना सोमेश्वर फाऊंडेशन तर्फे दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील शिष्यवृत्ती प्रदान करण्याचा आमचा मानस आहे.इयत्ता पाचवी व आठवी मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेस बसलेल्या आणि काहीच गुण कमी पडल्यामुळे शिष्यवृत्ती न मिळालेल्या विद्यार्थ्यांना उमेद न सोडता प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक व्हावे यासाठी प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्याचा आमचा मानस आहे. त्यासाठी आपण आपल्या शाळेतील क्रमवारी नुसार शिष्यवृत्ती न मिळालेल्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांची नावे सुचवावीत ही विनंती. यासोबतच डिप्लोमा, आयटीआय तसेच आर्टस, सायन्स, कॉमर्स, मेडिकल, इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर, कृषी, फार्मसी, मॅनेजमेंट, लॉ, जर्नालिझम इत्यादी शाखांतील पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुद्धा ही गौरव शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थी पुणे शहराचा रहिवासी असावा, पालकांचे वार्षिक उत्पन्न 6 लाखांच्या आत असावे आणि त्याने/तिने 10 वी आणि 12 वीला 75% पेक्षा अधिक आणि पदविका/पदवी परीक्षेत 75% पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले असावेत असा प्राथमिक निकष आहे. पात्रतेचे इतर निकष सविस्तरपणे अर्जात नमूद केलेले आहेत.

आबांनी सर्वसामान्यांना उत्तम शिक्षण आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधा मिळाव्या यासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यासाठी आबांनी सोमेश्वर फाऊंडेशनच्या माध्यमातून अनेक उपक्रम सातत्याने राबवले. स्व. मा. कार्यसम्राट आ. विनायक (आबा) निम्हण यांनी स्थापन केलेल्या सोमेश्वर फाऊंडेशनच्या माध्यमातून पुणे शहरात पाषाण व कोथरुड येथे सह्याद्री इंटरनॅशनल स्कूल तसेच पाषाण येथे ज्युनिअर कॉलेज कार्यरत असून अभ्यासिका पण उपलब्ध आहे. गेल्या 25 वर्षांपासून सातत्याने 10 वी व 12 वीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेची तयारी विषयक व्याख्यानमाला, गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ तसेच करियर मार्गदर्शन असे उपक्रम आयोजित करण्यात येतात. दरवर्षी नियमितपणे गरजू विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटपही करण्यात येते.

आरोग्य क्षेत्रातही सोमेश्वर फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात येते. त्यालाच व्यापक स्वरुप देत सलग दोन वर्ष पुण्यात भव्य मोफत महा-आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्यात जवळपास 1.50 लाख पेक्षा अधिक रुग्णांनी लाभ घेतला. या शिबीरात जगविख्यात डॉक्टरांकडून उपचार तसेच विविध तपासण्या, चाचण्या आणि अगदी मोठ्या शस्त्रक्रियाही मोफत करण्यात आल्या. गरजू रुग्णांना या महा-आरोग्य शिबीराचा मोठा लाभ झाला आहे.

येत्या 5 ऑगस्ट रोजी पुण्यात बालगंधर्व रंगमंदिर येथे 'विनायकी' - विनायक निम्हण गौरव शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे. आपणास विनंती आहे की आपण आपल्या महाविद्यालयातील पात्र, गरजू, होतकरु व गुणवंत विद्यार्थ्यांची नावे सुचवावीत आणि शाळेतील इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती न मिळालेल्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे. अधिक माहितीसाठी कृपया 8308123555 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा ही विनंती!

आपला विश्वासू

(स्वाक्षरी)

**सनी विनायक निम्हण**
नगरसेवक

**'विनायकी'** विनायक निम्हण गौरव शिष्यवृत्ती प्रदान समारंभ

**5 ऑगस्ट 2026 । सायं. 5 वाजता । स्थळ: बालगंधर्व रंगमंदिर, पुणे**